महाराष्ट्र शासन
वन विभाग
प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.
O/o Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य
Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State
"Van Bhavan" 3rd Floor, Ramgiri Road, Civil Lines, Nagpur 440 001

Phone - 0712-2549563
E-mail - pccfwlngp@mahaforest.gov.in
Website - www.mahaforest.gov.in

क्रमांक :- कक्ष-२३(४)/प्रक्र.८०(२०१९-२०)/१५२० दिनांक :- **२१ ऑक्टोंबर २०२०**

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती
मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर
वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर /
नवेगाव-नागझीरा व्याघ्र प्रकल्प, गोंदिया / सहयाद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर

विषय :- Requesting to revoke the age restrictions on tourist safari in TR

संदर्भ :- १) अप्रमुवसं (वजी) नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१(अ)/लले/पर्यटन/१४२, दि १०/०६/२०
२) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-२३(४)/प्रक्र.८०(१९-२०)/४६७, दिनांक २३/०६/२०२०
३) क्षेसं, ता.अ.व्या.प्र., चंद्रपूर यांचे पत्र क्र. कक्ष-४/लले/१५७१, दिनांक ०६/१०/२०२०

या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-२३(४)/प्रक्र.८०(२०१९-२०)/४६७, दिनांक २३/०६/२०२० अन्वये राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या दिनांक ०५ जुन २०२० च्या पत्रामधील सुचनांचे पालन करून निसर्ग पर्यटन सुरु करण्याची परवानगी देण्यात आलेली होती. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या दिनांक ०५ जुन २०२० च्या पत्रामधील अटी क्र. ५ मध्ये १० वर्षाखालील व ६५ वर्षावरील व्यक्तींना व्याघ्र प्रकल्पात प्रवेश देऊ नये अशी अट टाकलेली होती. महाराष्ट्र शासन, महसुल व व विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई आदेश दिनांक ३०/०९/२०२० Easing of Restriction and Phase-wise opening of Lockdown (Mission Begin Again) मधील अनेक्झर-II मधील अनुक्रमांक 5(i) मध्ये हॉटेल्स, फुट कोर्टस, रेस्टॉरेंट आणि बार इत्यादि यांना दिनांक ०५/१०/२०२० पासून 50% च्या मर्यादेत सुरू करण्याची परवागनी दिलेली आहे त्यामध्ये १० वर्षाखालील व ६५ वर्षावरील व्यक्तींना तसेच गर्भवती स्त्रीयांना प्रतिबंध केलेले नाही.

व्याघ्र प्रकल्पातील पर्यटन हे बंदिस्त वाहनातुन होत नसुन खुल्या वाहनात व खुले वातावरणात होत असते त्यामुळे वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांनी संदर्भिय पत्रान्वये सफारीकरिता येणा-या १० वर्षाखालील व ६५ वर्षावरील व्यक्तींना तसेच गर्भवती स्त्रीयांना परवानगी देण्यास विनंती केलेली आहे.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुर्व, नागपूर यांनी संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये केलेली शिफारस तसेच वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांनी सादर केलेल्या अहवाल तसेच राज्य

शासनाकडुन जारी केलेल्या निर्देश / मार्गदर्शसुचना या सर्व बाबी लक्षात घेता सफारीकरिता येणा-या १० वर्षाखालील मुले जर एकच कुटुंबातील असेल तर त्यांना परवानगी राहिल व एक जिप्सीमध्ये त्या कुटुंबातील ०६ लोकांना बसण्याची परवानगी राहिल. ६५ वर्षावरील व्यक्तींच्या बाबत Covid-19 ची परिस्थिती पाहुन वेगळयाने निर्णय घेण्यात येईल.

तरी प्रकरणी क्षेत्र संचालक यांनी राज्य / केंद्र शासनानी तसेच संबंधीत जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या निर्देश / मार्गदर्शक सुचनेचे अधिन राहुन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

(एम. के. राव) 2/10/20.

**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)**

**महाराष्ट्र राज्य.**

प्रतिलिपी :-

१) प्रधान सचिव (वने) महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीकरिता सादर.

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुर्व, नागपूर / पश्चिम, मुंबई

३) जिल्हाधिकारी, चंद्रपूर/नागपूर/कोल्हापूर/अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित.